Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY


**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**March -2019**

**SPECIAL ISSUE-CLXIX (B)**

# EMERGING TRENDS IN HUMANITIES & COMMERCE




**Executive Editor:**
Prof. Virag S. Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Dipak N. Raut
Principal
Sarswati Kala Mahavidyalaya,
Dahihanda, Dist -Akola [M.S.]

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

## INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | उस्मानाबाद जिल्हयातील भूमी - वापर व अडचणी यांचा तुलनात्मक अभ्यास — प्रा.आसाराम दि. चव्हाण | 10 |
| 2 | महार तरूणांना नौकर भरतीत संधी व जय भिम चे जनक बाबू एल. एन. हरदास — प्रा. आशिष गजानन थुल | 13 |
| 3 | भारतीय बँक प्रणाली समोरील गंभीर संकटे - एक चिकित्सा — प्रा. जयंत एम. बनसोड | 16 |
| 4 | हिमांशु जोशी के उपन्यासों में मानवीय मूल्य — प्रा. डॉ. एम. ए. काजी | 21 |
| 5 | जागतिक व्यापार संघटना (डब्लू.टी.ओ.) आणि भारतीय कृषि विकास सुधारणा. — प्रा.डॉ. अर्चना अंतुरकर (घवघवे), | 25 |
| 6 | योगेपनिषदों का योगतत्वज्ञान में योगदान — डॉ. कलापिनी हरेकृष्ण अगस्ती | 30 |
| 7 | डॉ. अम्बेडकर और शिक्षा — डॉ. अरविन्द कुमार | 36 |
| 8 | संस्कृतव्याकरणशिक्षणे आधुनिकविधीनामुपयोगिता — डॉ. शिवराम भट्टः | 45 |
| 9 | चौंडकं : स्त्रीवादी आकलन — डॉ. प्रभाकर देसाई /आरती भोसले | 53 |
| 10 | अध्ययन अकार्यक्षमता — डॉ.मीनाक्षी नंदकुमार मोरे | 58 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयीचे विचार — प्रा. सी. के. भाजीखाये | 64 |
| 12 | छत्रपती शाहू महाराज : भारताचे भाग्यविधाता — डॉ. लखपती गायकवाड | 70 |
| 13 | **बालकामगारांच्या विकासाठी मानवाधिकारात्मक संविधानिक तरतुदी — प्रा.प्रफुल्ल कडू** | 74 |
| 14 | **नक्षलवाद चळवळीद्वारे मानवाधिकाराचे उल्लंघन — डॉ.दिपक कृ.राऊत** | 79 |
| 15 | समस्या— समाधान विधि में अन्तर्निहित मनोवैज्ञानिक सिद्धान्तों और दार्शनिक मान्यताओं का अध्ययन — मणि माला कुमारी | 85 |
| 16 | पक्षी पाणपोई : जैवविविधता संवर्धन — श्री.अरविंद जिड्डेवार / डॉ. धर्मेंद्र तेलगोटे | 92 |
| 17 | अचलपूर विधानसभा मतदारसंघात प्रहार संघटनेच्या माध्यमातून केलेल्या कार्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन — डॉ. प्रशांत दि. सातपुते | 98 |
| 18 | Autism - Problem Behavior — **Asst. Prof. Kshitija b. Deshpande** | 102 |
| 19 | Education Implementation Based on Values in Educational Institutions — **Asst.Prof. kavita. Kathar** | 105 |
| 20 | Legislative measures and judicial approach to uplift the protective groups in india. — **Miss Yogita S. Hutke** | 110 |





Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
March 2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयीचे विचार

प्रा. सी. के. भाजीखाये
सहायोगी प्राध्यापक डॉ. एल.डी. वलखंडे कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स पवनी जिल्हा-भंडारा

**प्रस्तावना**

भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील गरीब, दलित, पीडित, महिला, कामगार आणि सर्व वंचित घटकांना न्याय, हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले, त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. हे अद्वितीय आणि क्रांतिकारक कार्य करणाऱ्या या मानवाचा आपल्या देशात जन्म झाला, ही खरोखरच सर्वांसाठी अभिमानाची बाब ठरते. बाबासाहेब हे लोकोत्तर नेते आणि प्रकांड पंडित होते. या देशाने सर्वांगीण प्रगती करावी, विकास करावा आणि त्यांची फळे तळागळातील सर्व घटकांना मिळावीत, यासाठी ते अखेरच्या श्वासापर्यंत झटलेल्या घटकांना आत्मसन्मान आणि आत्म भान मिळून देण्यासाठी त्यांनी लोकशाही शासन पद्धतीचा अवलंब केला. लोकशाही सबंधीचे विचार. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनातून उपजलेला नव्हता तर भोवतालच्या सामाजिक-राजकीय वास्तवाच्या मुशीतूनटीतो तावून सुलाखून निघाला होता. भारतात लोकशाहीची उभारणी करणे एवढ्यापुरतेच त्यांचे राजकीय ध्येयपरिमित नव्हते तर जगात जिथे जिथे लोकशाही असेल त्या सर्वच राष्ट्रांशी सहकार्य करून भारताने लोकशाही मूल्यांचे संरक्षण करावे अशी त्यांची मनीषा होती.

सामान्य माणसावर डॉ. आंबेडकरांचा एवढा लोभ आणि विश्वास होता की त्यांच्या व्यक्तिगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापनेसाठी लोकशाही जीवन मार्गाचा त्यांनी ध्यास घेतला होता. जुलूम, जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्ती करणारी शासन व्यवस्था कशी असावी हाच शोध त्यांनी आमरण चालविला होताण्या देशातील सामाजिक संबंधाची संरचना फक्त लोकशाही राजवटच करू शकेल असा त्यांचा विश्वास होता. लोकशाही म्हणजे सहजीवन, लोकशाहीची मुळे सामाजिक सबंधातच आढळतात अशी त्यांची धारणा होती.

ज्या समाजात भिन्न सामाजिक गटांच्या सांस्कृतिक दृष्टिकोनात प्रबळ तपावती असतात, आणि भिन्न लोकसमूहाच्याठिकाणी सहजीवनाची भावनाच अपुरी वा अनुपस्थित असते तेथे लोकशाही वातावरण निर्माण होणे अवघड असते. हा विचार डॉ॰ आंबेडकरांच्या लोकशाहीवरोल चिंतनाचा केंद्रबिंदू होता. दारिद्र्य, निरक्षरता व जातीय पृथगात्मता हे त्यांच्या मते भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील अडथळे होते. जोपर्यंत प्रयत्नपूर्वक या तिघांचे निर्मूलन होत नाही तोपर्यंत या देशात लोकशाही अस्तित्वात येऊ शकत



Scanned with OKEN Scanner